# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र ०२२ २६५४ ३०३५/२६५३ ०२८३
ई मेल - cap@exam.mu.ac.in

केंद्रिय मुल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग,
महात्मा ज्योतीराव फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.


संदर्भ ः परिक्षा/कें.मु.कें. /1002/२०१५ दिनांक ः २४/०४/२०१५

## परीपत्रक

**बी.एससी. (कॉम्पुटर सायन्स) ( B.Sc Computer Science ) व बी.एससी. (ईफॉरमेशन टेक्नॉलॉजी) ( B.Sc Information Technology ) या अभ्यासक्रमाचे कोर्सेस आयोजीत करणा-या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य / संचालक यांना कळविण्यात येते की,**

विद्यापीठातर्फे गत दोन वर्षापासून अभियांत्रिकी परीक्षेच्या उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन व नियमनाचे काम संगणकाद्वारे ( On Screen Marking – OSM ) केले जात आहे. सदर संगणकाद्वारे मुल्यांकन अत्यंत उत्तमप्रकारे संपन्न झाल्यामुळे अभियांत्रिकी परीक्षेचे निकाल विहीत मुदतीत जाहीर करणे शक्य झाले आहे. संगणकाद्वारे मुल्यांकन ( On Screen Marking – OSM ) सुरू केल्यामुळे परीक्षकांचे बबलींग करण्याचे, मार्कलिस्ट तयार करण्याचे, टोटलींग करण्याचे, बेस्ट ऑफ मार्क्स घेण्याचे, इत्यादी कामे आपोआप केली जातात. त्यामुळे परीक्षकांचे काम सोपे झाले आहे तसेच निकाल लवकर लागणे शक्य झाले आहे.

प्रथम सत्र २०१५ च्या परीक्षांपासून बी.एससी. (कॉम्पुटर सायन्स) ( B.Sc Computer Science ) व बी.एससी. (ईफॉरमेशन टेक्नॉलॉजी) ( B.Sc Information Technology ) या अभ्यासक्रमाचे सेमिस्टर- V व VI परीक्षांचे उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन व नियमनाचे काम संगणकाद्वारे ( On Screen Marking – OSM ) करावयाचे ठरले आहे. त्याअनुषंगाने, संगणकीय मुल्यांकनाबाबत ( OSM ) खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

१. संगणकिय मुल्यांकनाबाबत प्रशिक्षण रविवार दि.२६ एप्रिल, २०१५ रोजी केंद्रिय मुल्यांकन केंद्र (चौथा मजला), परीक्षा विभाग, महात्मा फुले भवन, विद्यानगरी, कलिना, सांताक्रुझ (पुर्व), मुंबई - ४०० ०९८ येथे आयोजित करण्यात आले आहे. प्रशिक्षणाचा कालावधी ३० मिनिटे असून सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.०० वाजता पर्यंत दिवसभर सुरू असणार आहे. आपल्या महाविद्यालयातील मुल्यांकन समन्वयक (CAP Co-ordinater) किंवा संगणक प्रणालीतील माहितीगार शिक्षकांना ( किमान दोन शिक्षक ) सदर प्रशिक्षणासाठी पाठवावे. सदर शिक्षक संगणकीय मुल्यांकनाबाबत ( OSM ) प्रशिक्षण घेऊन आपापल्या महाविद्यालयातील संबंधित शिक्षकांना आवश्यकतेप्रमाणे प्रशिक्षण / मार्गदर्शन करतील.
२. सोमवार व मंगळवार दि.२७ व २८ एप्रिल, २०१५ रोजी संगणकीय मुल्यांकनाबाबत ( OSM ) चे सॉफ्टवेयर आपल्या महाविद्यालयातील संगणकांवर टाकण्याची प्रक्रिया करून दिली जाईल.
३. बुधवार दि.२९ एप्रिल, २०१५ पासून संगणकीय मुल्यांकन (OSM) सुरू करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
४. आपल्या महाविद्यालयातील मुल्यांकन समन्वयक (CAP Co-ordinater) यांचे नाव, दुरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी तसेच महाविद्यालयाचा ई-मेल याबाबतची माहिती **cap.osm2015@gmail.com** या ईमेलवर पाठवावी.

त्याअनुषंगाने, सदर परीपत्रक महाविद्यालयाच्या / संस्थेच्या सुचना फलकावर प्रदर्शित करावे व परीपत्रकातील सुचनांची अंमलबजावणी करावी ही विनंती.

परीक्षा नियंत्रकाकरीता